नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

दिनांक 23/10/2021 (शनिवार)
(सायंकाळ)

---

## अवैधरीत्या शस्त्र बाळगुण दरोडा टाकण्याच्या तयारीत असलेल्या आरोपीतांना अटक पोलिस स्टेशन रामटेक ची कारवाई

दि. 22/10/2021 ते दि. 23/10/2021 रोजी फिर्यादी परि पोउपनि श्री ओम राज कलेगुरवार हे स्टाफसह बस स्टाप रामटेक येथे नाकाबंदी करीत असतांना 02:20 वा. दरम्याण एक एम.एच–46/ डब्ल्यु– 456 क्रमांकाची सिल्व्हर रंगाची फॉरच्युनर कार मनसर कडुन रामटेक कडे येत असतांना दिसली. तेव्हा सदर फॉरच्युनर वाहनाचे चालकास पोलिसाने वाहन थांबविण्याचा इशारा केला असता चालकाने त्याच्या ताब्यातील वाहन न थांबविता सदरची फॉरच्युनर कार नाकाबंदीचे ठिकाणावरून अतिवेगाने निघुन बस स्थानकाचे आत गेल्याने सदर वाहनाचा पाठलाग करून वाहनास बसस्थाकावर थांबविण्यात आले. सदर वाहनाची पाहणी केली असता त्यात 6 इसम बसलेले दिसले त्यांच्या ताब्यातून एक काळ्याा रंगाची लॉग राईफल ज्यावर गन स्टेलीस स्कोप बसविला असुन, त्यावर इंग्रजी अक्षरात gamo sporter 3 -9x40ir, maden in spain असे लिहलेले कि. 15,000/–रू. तसेच एक मॅकझीन ज्यामध्ये 7 जिवंत काडतुस किमंत अंदाजे 700/–रू., एक निळया रंगाचे कव्हर असलेली व स्टीलचे पाते असलेली तलवार कि. 2000/–रू., पांढ–या रंगाची 10 फुट लांब रस्सी, 1 किलो लाल मिरचीची पुड व एक फॉरच्युनर कार किंमत 10,00,000/–रू. तसेच एकुण 6 मोबाईल कि. 26,000/–रू. असा एकुण कि. 10,43,700/–रू. चा मुद्देमाल मिळुन आला. आरोपी क्र. 1) सुनिल उर्फ टायगर मिठाईलाल गोंड वय 45 वर्ष, रा. कामठी खदान कॉलरी नं. 3, कन्हान ता. पारशिवनी जि. नागपुर 2) राजन श्रीनिवास विनयवार वय 25 वर्षे रा. संताजी नगर जि.एन.रोड कांद्री कन्हान वाईन शॉपचे पाठीमागे कन्हान ता. पारशिवनी जि. नागपुर, 3) रमेश श्रावण मनगटे वय 38 वर्ष, रा. कामठी खदान कॉलरी नं. 3,कन्हान ता. पारशिवनी जि. नागपुर 4) शुभम चंद्रशेखर वियनवार वय 21 वर्षे रा. तुमडीपुर, लालावली, जुनी कामठी ता. कामठी, 5) राहुल उपासराव बागडे वय 22 वर्षे रा. घोगरी ता. पांढुर्णा जि. छिंदवाडा, 6) सचिन रमेश देशमेर वय 24 वर्ष रा. टागला ता. रामटेक जि. नागपुर यांना सदर हत्याराबाबत परवाना विचारला असता त्यांच्या जवळ कोणत्याही प्रकारचे कागदपत्रे मिळुन आले नाही. आरोपी हे शस्त्रे व अग्नीशस्त्रे बाळगुन कोठेतरी दरोडा टाकण्याच्या प्रयत्नास असल्याने वरील वर्णनाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदर प्रकरणी सरकारतर्फे परि पोउपनि श्री ओम राज कलेगुरवार, पोस्टे. रामटेक यांचे रिपोर्टवरुन पो. स्टे. रामटेक येथे आरोपीतांविरुध्द कलम 399, 34 भादवी सहकलम 3, 25 भारतीय हत्यार कायद्यन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. नमुद आरोपीतांना अटक करण्यात आली असुन गुन्हयाचा पुढील तपास पोलिस निरीक्षक श्री प्रमोद मकेश्वर मो नं.9049965014 हे करीत आहेत.

सदरची कार्यवाही पोलिस अधीक्षक नागपुर ग्रामीण श्री. विजयकुमार मगर, अपर पोलिस अधीक्षक श्री राहुल माकणीकर, उपविभागिय पोलिस अधिकारी रामटेक विभागच्या चार्ज मध्ये उपविभागिय पोलिस अधिकारी कन्हान श्री मुख्तार बागवान यांचे मार्गदर्शनात ठाणेदार पोनि श्री प्रमोद मकेश्वर, परि पोउपनि श्री ओम राज

कलेगुरवार, पोलिस शिपाई शिवाजी दिंडे, अतुल बांते, आकाश वरखडे, उमेश परसगाये, नितीन गिऱ्हेपुंजे, चालक पोशि गोपीचंद बेंदरे, मपोशि सारीका राठोड व निलीमा ईवनाते यांनी केलेली आहे.





## विनयभंग करणाऱ्या आरोपीला कोर्टातुन शिक्षा

पो.स्टे. मौदा :– दिनांक 31/07/2020 चे 17.59 वा. दरम्यान फिर्यादी यांच्या रिपोर्ट वरुन पो.स्टे. मौदा येथे अप. क्र. 410/2020 कलम 354, 354 (अ) (1) (आय) भादवी सहकलम 8, 12 बाल लैगींक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

दिनांक 27/07/2020 चे 16.00 वा. दरम्यान 17 वर्षीय पिडीत/फिर्यादी हि आपल्या गावी जान्याकरीता मौदा बसस्टॉप वर उभी असता आरोपी नामे – अतुल तुळशिराम ढोमने वय 31 वर्ष, रा आजनगाव ता मौदा याच्या छोटा हाती वाहनात गावी जान्यारीता बसली असता आरोपीने पिडीतेच्या मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला. आरोपीला दिनांक 31/07/2020 चे 17.59 वा. दरम्यान अटक करण्यात आली.

सदर प्रकरण्याचे तपास तत्कालीन महिला पोलीस उपनिरीक्षक संगमित्रा बांबोळे/पोनि श्री गिते, पो.स्टे. मौदा यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. कोर्टामध्ये सादर केले. आज दिंनाक 23/10/2021 रोजी मा. कोर्ट विद्यमान न्यायाधीश श्री. एस. आर. त्रिवेदी, अतिरीक्त जिल्हा सत्र न्यायाधिश, नागपूर यांनी वरील नमुद आरोपीला कलम 354 भादंवि. मध्ये 3 वर्ष सश्रम कारावास व 2000/–रु. दंड व दंड न भरल्यास 1 महिना साधी शिक्षा, कलम 354 (अ), भादंवि मध्ये 3 वर्ष सश्रम कारावास व 2000/–रु. दंड व दंड न भरल्यास 1 महिना शिक्षा तसेच कलम 8 बाल लैगींक अत्याचार प्रतिबंधक कायदा मध्ये 3 वर्ष सश्रम कारावास व 2000/–रु. दंड व दंड न भरल्यास 2 महिना शिक्षा तसेच कलम 12 बाल लैगींक अत्याचार प्रतिबंधक कायदा मध्ये 2 वर्ष सश्रम कारावास व 1000/–रु. दंड व दंड न भरल्यास 15 दिवस साधी शिक्षा अशी शिक्षा ठोठावली आहे.

सरकारचे वतीने एपीपी श्रीमती. पांडे यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अधिकारी म्हणुन सहायक पोलिस निरीक्षक श्री. किशोरकुमार वैरागडे तर कर्मचारी सहा.फौज. श्री. शंकरराव तराळे, श्री. रमेश धामणे व पोशि श्री. विकास वाटकर यांनी मदत केली आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर